महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
Website :www.mahadiscom.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मासंवि/मावक/२७५०८
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड,माटुंगा,
मुंबई-४०००१९.
email : managerbcrrc1@gmail.com
**दिनांक : २०.१०.२०२२**

# परिपत्रक

**विषय :** अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ :**
१) शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि. २१/१२/२०१९.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५९८ दि. ३१/१२/२०१९.
३) शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि. २७/११/२०२०.
४) परिपत्रक क्र. मासंवि/मावक/२०६२१ दि. २७/११/२०२०.
५) शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि. २८/१०/२०२१.
६) परिपत्रक क्र. मासंवि/मावक/२६७१५ दि. २९/१०/२०२१.
७) शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि. १४/१०/२०२२.

---------------

आरक्षण कायदा-२००४ नुसार मागासवर्गीयांच्या शासकीय सेवेतील आरक्षणांच्या आदेशाची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी शासन स्तरावर वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रकान्वये सूचना/तरतुदी निर्गमित केल्या आहेत.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र. ८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर एफसीआय आणि इतर विरुध्द जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दि. ०६/०७/२०१७ रोजी मागास जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही, असा निर्णय दिला आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्र. ३१४०/२०१८ मध्ये दि. २८/०९/२०१८ च्या आदेशान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दि. ३१/१२/२०१९ पर्यंत कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. मा. उच्च न्यायालयाचे सदर आदेश विचारात घेता मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने संदर्भीय शासन निर्णय क्र. १ निर्गमित केला होता. सदर शासन निर्णय महावितरण कंपनीचे प्रशासकीय परिपत्रक क्र. ५९८ दि. ३१/१२/२०१९ अन्वये अंगीकृत करण्यात आलेला आहे.

३. शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि. २१/१२/२०१९ अन्वये अधिसंख्य पदावर नेमणूक देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचा ११ महिन्यांचा कालावधी दि. ३०/११/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने अशा कर्मचाऱ्यांना शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि. २७/११/२०२० अन्वये पुढील ११ महिने किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत किंवा अभ्यास गटाच्या शिफारशी शासनास प्राप्त होऊन त्यावर शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. (परिपत्रक क्र. मासंवि/मावक/२०६२१ दि. २७/११/२०२०)

४.	तदनंतर, अभ्यास गटाचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यांवर शासनाचा अंतिम निर्णय होण्यास काही कालावधी लागणार असल्यामुळे तसेच अधिसंख्य पदावर नेमणूक देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचा ११ महिन्यांचा कालावधी दि. ३१/१०/२०२१ रोजी संपुष्टात येत असल्याने शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/ प्र.क्र.३०८/१६-ब दि. २८/१०/२०२१ अन्वये अधिसंख्य पदांवर मुदतवाढ देण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अधिसंख्य पदांवरील नियुक्त्यांना, त्यांच्या अधिसंख्य पदावरील ११ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील ११ महिने किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत किंवा अभ्यास गटाच्या शिफारशी शासनास प्राप्त होऊन त्यावर शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. (परिपत्रक क्र. मासंवि/मावक/२६७१५ दि.२९/१०/२०२१)

५.	शासनाने स्थापन केलेल्या अभ्यास गटाच्या शिफारशी प्राप्त झाल्या असून त्यावर शासनाच्या अंतिम निर्णय होण्यास काही कालावधी लागणार असल्याने व अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांचा ११ महिन्यांचा मुदतवाढीचा कालावधी दि. ३०/०९/२०२२ रोजी संपुष्टात येत असल्याने अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब दि. १४/१०/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय :</u>**

i) शासन निर्णय दि. २८/१०/२०२१ अन्वये अधिसंख्य पदावर मुदतवाढ देण्यात आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना, त्यांच्या अधिसंख्य पदावरील ११ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील ११ महिने किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत किंवा अभ्यास गटाच्या शिफारशींवर शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

ii) सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश तातडीने निर्गमित करुन या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी.

६.	सबब, सर्व संबंधित अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १४/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे. तसेच सदर शासन निर्णयातील आदेश/सूचना यांचे काटेकोरपणे पालन होईल, याबाबत दक्षता घेण्यात यावी. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

७.	सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या MSEDCL E-Library Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

**(अरविंद भादीकर)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन निर्णय क्रमांकः बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १४ ऑक्टोबर, २०२२

**वाचा :-**

१) **शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१.१२.२०१९**

२) **शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः बीसीसी-२०१९/प्र.क्र.५८१/१६-ब, दि.१५.०६.२०२०**

३) **शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २७.११.२०२०**

४) **शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकः बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २८.१०.२०२१**

**प्रस्तावना :-**

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ६ जुलै, २०१७ रोजीच्या निर्णयाची तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्या दि. २८.०९.२०१८ च्या आदेशाची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या दि. २१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या आरक्षित पदावर नियुक्त झालेल्या व अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करून त्यांना ११ महिन्यांकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवा निवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर नेमणूक देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर अधिसंख्य पदांना दि. २७.११.२०२० व दि. २८.१०.२०२१ च्या शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

२. अधिसंख्य पदावर नेमणूक दिल्यानंतर अशा कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत चालू ठेवाव्यात किंवा कसे तसेच त्यांना अनुज्ञेय करावयाच्या सेवा विषयक/ सेवा निवृत्तीविषयक लाभांबाबत सविस्तर अभ्यास करून शासनास शिफारशी करण्यासाठी तत्कालिन मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भ क्र.२ येथील दि. १५.०६.२०२० च्या शासन निर्णयान्वये अभ्यास गट स्थापन करण्यात आला आहे.

३. सदर अभ्यास गटाच्या शिफारशी प्राप्त झाल्या असून त्यावर शासनाचा अंतिम निर्णय होण्यास काही कालावधी लागणार असल्याने व अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांच्या ११ महिन्याच्या मुदतवाढीचा कालावधी दि. ३०.०९.२०२२ रोजी संपुष्टात येत असल्याने अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

संदर्भ क्र. ४ येथील शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर मुदतवाढ देण्यात आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना, त्यांच्या अधिसंख्य पदावरील ११ महिन्यांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील ११ महिने किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले

असते त्या दिनांकापर्यंत किंवा अभ्यास गटाच्या शिफारशींवर शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांना/ आस्थापनांना योग्य ते आदेश तातडीने निर्गमित करून या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१०१४१६५२१३७५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rasik Ambadas Khadse

Digitally signed by Rasik Ambadas Khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=41d02a5c663d2c05d362d4847bea4a1874fda4e9cb60284fb102fd7b9b3891b3, cn=Rasik Ambadas Khadse
Date: 2022.10.14 16:55:53 +05'30'

**(र.अ.खडसे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा
७. सर्व विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
९. मा. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
१०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा)
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद)
१२. सर्व विभागीय आयुक्त
१३. सर्व सहाय्यक आयुक्त (मागास वर्ग कक्ष)
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१६. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१८. प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई

१९. सचिव, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद
२०. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
२१. सचिव, राज्य निवडणूक आयोग
२२. सचिव, राज्य माहिती आयोग
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२४. राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२५. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
२६. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा, नगरपालिका
२७. संचालक, समाजकल्याण, पुणे
२८. आयुक्त आदिवासी विकास, नाशिक
२९. आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
३०. संचालक, सेवायोजन, मुंबई
३१. निवडनस्ती.